जा. क्रं.उमाशि-२/शिमा/पुवि/२०१२
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १. यांचे कार्यालय,
दि :-७/८/२०१२

**प्रति,**

**१. प्राचार्य, नौरोसजी वाडीया महाविद्यालय, पुणे १**
**२. प्राचार्य, रा.प.सबनीस माध्य व उच्च माध्य विद्यालय, नारायणगांव, ता. जुन्नर पुणे**
**३. प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे**
**४. प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पील महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर**
**५. प्राचार्य, वालचंद महाविद्यालय, सोलापूर**
**६. प्राचार्य, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर**
**७. प्राचार्य, प. विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर**

**विषय - शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पटपडताळणी □ार्यभार निश्चिती संच मान्यता शिबीराचे आयोजनाबाबत.**

शैक्षणिक वर्ष स-न २०१०-११ पासून पुणे विभागातील सर्व कनिष्ठ महाविद्यालये व उच्च माध्यमिक शाळांची संच मान्यता आणि तक्ता **अ** व **ब** मधील शिक्षकांच्या मान्यता पुढे चालू ठेवण्याबाबत ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मधील संच मान्यतेची सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेली माहिती तपासून संच मान्यता तक्ता अ व ब मधील मान्यता आदेश देण्याबाबतच्या शिबीराच्या आयोजनाचे वेळापत्रक सोबत जोडलेले आहे.

आपल्या महाविद्यालयाची सदर शिबीराचे आयोजन करण्याबाबत निवड करण्यात आली आहे. ऑनलाईन पध्दतीने संच मान्यता व तक्ता अ व ब मधील शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांच्या मान्यता देण्याबाबत आवश्यक त्या सर्व भौतिक सुविधा (उदा. चार संगणक, चार प्रिंटर, इंटरनेट कनेक्शन, अखंडीत वीजपुरवठयासाठी जनरेटर बॅकअप सुविधा, आवश्यक ती स्टेशनरी, वगैरे) उपलब्ध करावी. ऑनलाईन संच मान्यता व शिक्षक मान्यतेच्या शिबीराबाबत आपले बहुमोल सहकार्य मिळावे ही विनंती.

स्वाक्षरी/-
**(भिमराव फडतरे)**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विचभाग, पुणे १**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**
**मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)**
**शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १.**